# डीएसके मोटोव्हील्सची बेनेली कंपनीशी भागीदारी

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. १७ : डीएसके मोटोव्हील्स कंपनीने इटलीमधील बेनेली कंपनीशी भागीदारी केली असून, 'डीएसके बेनेली' आता देशातील सुपरबाइक बाजारपेठेत लवकरच आगमन करणार आहे, अशी घोषणा डीएसके मोटोव्हील्सचे अध्यक्ष शिरीष कुलकर्णी यांनी शुक्रवारी येथे केली.

कुलकर्णी म्हणाले, "आजचे तरुण मोठ्या संख्येने सुपरबाइककडे आकर्षित होत आहेत. सुपरबाइकवरून लांबच्या प्रवासाचा आनंद लुटणाऱ्यांचे प्रमाण वाढते आहे. त्यामुळे 'डीएसके बेनेली' लवकरच पाच सुपरबाइक भारतीय बाजारपेठेत आणणार आहे. त्याची लवकरच घोषणा केली जाईल. ६०० सीसीची दोन मॉडेल्स, ३०० सीसी, ८९९ सीसी आणि ११३० सीसी अशा पाच सुपरबाइकचा त्यात समावेश आहे. आकर्षक डिझाइनमुळे त्या देशातील बाइकप्रेमींच्या निश्चित पसंतीला उतरतील." देशात 'बाइक कल्चर' वाढत आहे. त्यामुळे भविष्यात याची मागणी वाढणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

'बेनेली क्सुजे एसआरएल'चे संचालक फ्रँक झुआंग म्हणाले, "भारतातील दुचाकी वाहनांची बाजारपेठ दर वर्षी दहा ते बारा टक्क्यांनी वाढते आहे. युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, चीन या जगभरातील तीस बाजारपेठांमध्ये बेनेलीची वाहने आहेत. आता आम्ही जगात दुचाकींमध्ये दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या बाजारपेठेत सर्वोत्तम डिझाइनची सुपरबाइक सादर करणार आहोत."